महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मआ/उआ(वि)/६७४
दिनांक -2 DEC 2015

मा.नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर...

**विषय**:-केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत पुणे शहराचा **"स्मार्ट सिटी प्रस्ताव/अहवाल"** मा.राज्यशासनामार्फत मा.केंद्रशासनाकडे पाठविण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत.

**संदर्भ**:-१. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रं.स्मार्ट सिटी-२०१५/प्र.क्र.१३०/नवि-३३, दि.०१/०७/२०१५.
२.केंद्रशासनाकडून स्मार्ट सिटी बाबत प्राप्त मार्गदर्शक सूचना

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाकिंत शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आल्यानुसार "केंद्र शासनामार्फत लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच स्वच्छ, शाश्वत व पर्यावरणपूरक शहरे तयार करण्यासाठी स्मार्ट सिटी अभियान या महत्वाकांक्षी अभियानाची घोषणा दिनांक २५.०६.२०१५ रोजी करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाकडून यासाठी विहित केलेली मार्गदर्शक तत्वे प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने अंगीकृत करणे आवश्यक आहे.

या स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत १०० शहरांची निवड केली जाणार आहे आणि या मिशनचा अवधी पाच (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०१९-२०) वर्षाचा असणार आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त स्मार्ट सिटी मार्गदर्शक सूचनानुसार स्मार्ट सिटीमध्ये ९८ शहरांची निवडप्रक्रिया (दि.२७ ऑगस्ट २०१५) पार पडली असून, यामध्ये पुणे महानगरपालिकेने प्रथम टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत क्षेत्र निहाय धोरणात्मक घटक म्हणजे शहर सुधारणा (नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन सुधारणा करणे), शहर नूतनीकरण (पुनर्विकास) आणि शहर विस्तार (ग्रीनफील्ड विकास) तसेच पॅनसिटी उपक्रम ज्यात शहराचा मोठा भाग व्यापून स्मार्ट उपाय लागू केले जातात. क्षेत्र निहाय स्मार्टसिटी विकासाचे तीन मॉडल्स शासनाने निश्चित करुन दिलेले आहेत.

**१.रेट्रोफिटींग (शहर सुधारणा)**: नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन शहरातील ५०० एकरा पेक्षा जास्त असलेल्या एखाद्या क्षेत्रात सुधारणा करणे. या मॉडेलमध्ये क्षेत्रातील अस्तित्वात असलेला संरचना/बांधकामे तशीच राहवीत यासाठी अधिक अत्याधुनिक पायाभूत सेवा पातळ्या आणि मोठ्या प्रमाणातील स्मार्ट उपाय यांचा व नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन क्षेत्राची सुधारणा करणे अभिप्रेत आहे. यामुळे शहराच्या दुसऱ्या भागावर या सुधारणांचा प्रभाव पडेल व शहरातील इतर क्षेत्र देखील याअनुषंगाने सुधारित करणेचे अभिप्रेत आहे.

**२.पुनर्विकास(शहर नुतणीकरण)**: या मॉडेलच्या अंतर्गत शहरातील ५० एकरापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या भाग ज्यामध्ये जमीनीचा मिश्र वापर, जास्तीत जास्त एफएसआय, याअनुषंगाने आराखडा तयार करण्यात येऊन त्याभागाचे नूतणीकरण करणे. उदा: मुंबईमधील सैफी बुऱ्हाणी अपलिफ्टमेंट प्रकल्प (भेंडी बाजार प्रकल्प), नवी दिल्ली येथील पूर्व किडवाईनगरचा पुनर्विकास

**३.ग्रीनफील्ड (शहर विस्तार)**: या मॉडेल अंतर्गत नाविण्यपूर्ण योजना तसेच योजना अंमलबजावणीची साधने (उदा: जमीन संग्रह/जमीनीची फेररचना) याचा उपयोग करुन परवडणाऱ्या घरांची, विशेषत: गरिबांसाठी तरतुद करुन २५० एकरापेक्षा जास्त क्षेत्र निश्चित करुन उर्जा सक्षम व हरित इमारतींची निर्मीती करुन शहराचा विस्तार करणे अभिप्रेत आहे. उदा: जीआयएफटी सिटी(गुजरात)

पॅनसिटी विकासामध्ये अस्तित्वात असलेल्या संपूर्ण शहरातील पायाभूत सूविधांसाठी निवडलेले स्मार्ट उपाय लागू करण्याचा विचार करण्यात येतो. यामध्ये तंत्रज्ञान, माहिती आणि डेटा यांचा वापर करणे पायाभूत सुविधा आणि सेवा अधिक चांगल्या करणे यासाठी स्मार्ट उपाय लागू करणे अभिप्रेत असून त्यामुळे नागरिकांच्या गुणवत्तापूर्ण जीवनावर सकारात्मक परिणाम होतो. उदा: सांडपाण्याचे पुनर्चक्रण करणे, स्मार्ट मीटरिंग, स्मार्ट पार्किंग, कुशल वाहतुक व्यवस्थापन, मोकळ्या जागांचा कल्पक वापर,स्मार्ट उर्जा, सक्षम रस्ते, प्रकाशयोजना इ.

शॉर्ट लिस्टेड शहराच्या स्मार्ट सिटी प्रस्तावामध्ये उपरोक्त नमूद तीन मॉडेलपैकी किमान एक आणि किमान एक पॅन सिटी प्रस्ताव अंतर्भूत असणे आवश्यक आहे. तसेच स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार करण्यासाठी सल्लागार फर्मची देखील नियुक्ती करण्याची मुभा केंद्रशासनाने दिलेली आहे.

स्मार्ट सिटी निवड प्रक्रियेमध्ये टप्पा-१ मध्ये राज्यस्तरावर स्पर्धा होऊन राज्याला निश्चित करुन दिलेल्या कोट्या नुसार राज्यस्तरावर राज्यातील शहरांची निवड करणेत आली. तदनंतर केंद्रशासनस्तरावरुन ९८ स्मार्टसिटीचे शॉर्ट लिस्टिंग करणेत आले. शॉर्ट लिस्ट झालेल्या शहरांनी त्यांचा स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार करणे तदनंतर निर्दिष्ट तारखेला (१५ डिसेंबर सांयकाळी ५.३० वाजेपर्यंत) टप्पा -२ चे प्रस्ताव केंद्रशासनास सादर करणे व तज्ञांच्या पॅनेल द्वारे शहरांच्या प्रस्तावांचे मूल्यमापन होणार आहे. तद्नंतर प्रथम वर्षासाठी शहरांची निवड केंद्रशासनामार्फत जाहीर करण्यात येणार आहे. निवड झालेली शहरे ही मा.स्थायी समिती, मा.सर्व साधारण सभा व राज्य शासनाच्या मान्यतेने विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही)ची स्थापना झालेनंतर अंमलबजावणी (डीपीआर, टेंडरर्स इ.तयार करणे) सुरुवात शहर स्तरावर करण्यात येणार आहे.

उपरोक्त शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने दि.२७ ऑगस्ट २०१५ पासून १०० दिवसांच्या आत राज्यशासनामार्फत केंद्रशासनाकडे प्रस्ताव पाठविण्याच्या दृष्टीकोनातुन पुणे महानगरपालिकास्तरावर उपाय योजनांची सुरुवात करण्यात आली. त्यामध्ये शहराचा दृष्टीकोन(Envision),शहराची उद्दीष्टे (Goal/Diagonse Phase) ओळखणे, शहराच्या समस्यांच्या अनुषंगाने सहनिर्मिती उपाययोजना (Solution/Cocreate Phase) निश्चित करणे, दोन दिवसांच्या कार्यशाळेमध्ये शहरांच्या समस्यांच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजना अंतिम करणे (Refine Phase) व अंतिमत: निश्चित केलेल्या उपाययोजना व स्मार्ट सिटी प्रस्तावाचे महत्वाचे घटक नागरिकांसाठी उपलब्ध करुन देणे (Share Phase).

**स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत पॅनसिटीच्या उपाययोजना निश्चित करताना खालील टप्प्यांमध्ये कार्यवाही करण्यात आलेली आहे.**

**अ)Envision Phase :-** दि.१७/०९/२०१५ ते दि.२९/०९/२०१५ पावेतो महानगरपालिकेचे कर्मचारी, समुहसंघटीका, विद्यार्थी, शहरातील विविध संघटना/संस्था इ. च्या माध्यमातुन ऑफलाईन पध्दतीने मनपा पुणे तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने घरोघर जाऊन नागरिकांकडून सर्व्हेक्षण करण्यात आले. तसेच सदरची प्रश्नावली ऑनलाईनचे माध्यमातुन पुणे महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिली होती. या सर्वेक्षणाचे अनुषंगाने शहराचा दृष्टिकोन (Vision) तयार करण्यात आले. सदर प्रश्नावली मध्ये भविष्यातील पुणे कसे असावे? व शहरामध्ये नागरिकांना सध्या कोणत्या ३ मोठया समस्यांना सामोरे जावे लागत आहे? असे दोन प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले होते सदरचे प्रश्न www.punesmartcity.in या वेबसाईटचे ऑनलाईन माध्यमातून तसेच ऑफलाईन माध्यमातुन प्रश्नावलीव्दारे सर्व्हेक्षण करण्यात आले. सदरची प्रश्नावली तथा फिडबॅक फॉर्म हा मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत नागरिकांकरीता उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर फेज मध्ये पुणे शहरातील ३ लक्षपेक्षा जास्त कुटुंबानी सहभाग नोंदविला.

**ब)Diagonse Phase :-** (दि.०३/१०/२०१५ ते दि. १२/१०/२०१५ पावेतो) पुणे शहराच्या सार्वजनिक जीवनावर परिणाम करणारे ६ क्षेत्र (वाहतूक आणि गतिशिलता, पाणी पुरवठा आणि मलनि:सारण, कचरा आणि स्वच्छता, उर्जा, सुरक्षितता आणि संरक्षण, पर्यावरणीय टिकाऊपणा) ही सहा क्षेत्रे नागरिकांनी निश्चित करुन दिली होती. या क्षेत्रातील संधी ओळखणे याकरीता दुसऱ्या टप्प्यातील ऑनलाईन अभियान राबविण्यात आले होते. सदरच्या फेजमध्ये पुणे शहरातील १ लक्ष पेक्षा जास्त कुटुंबानी सहभाग नोदंविला.

**क)Cocreate Phase :-** (दि.१५/१०/२०१५ ते दि. ३१/१०/२०१५ पावेतो) नागरिकांनी निश्चित करुन दिलेल्या समस्यांच्या आधारे उपाययोजना त्या-त्या क्षेत्रात काम करणारे विषयतज्ञ, मनपाचे अधिकारी, सोल्युशन प्रोव्हायडर कंपनी इ.च्या माध्यमातुन निश्चित करण्यात आल्या. या फेजदरम्यान १०,००० पेक्षा जास्त नागरिकांकडून विविध समस्यांवर उपाययोजना प्राप्त झाल्या.

**ड) Refine Phase :-** दि.०३/११/२०१५ ते दि.०४/११/२०१५ पावेतो या कालावधीत वाहतूक आणि गतिशिलता, पाणी पुरवठा आणि मलनि:सारण, कचरा आणि स्वच्छता, या समस्यांच्या अनुषंगाने दोन दिवसांच्या कार्यशाळेमध्ये विषय तज्ञ, मनपा अधिकारी , त्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्था व पदाधिकारी यांचा समावेश होता. सदर कार्यशाळेमध्ये शहरांच्या प्रमुख भेडसावणाऱ्या समस्यांच्या अनुषंगाने उपाययोजना अंतिम करण्यात आल्या.

**इ)Share Phase :-** अंतिमत: निश्चित केलेल्या उपाययोजना व स्मार्ट सिटी प्रस्तावाचे महत्वाचे घटक नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच ७ लक्ष कुटुंबापावेतो लिखीत शपथेच्या स्वरुपातील फॉर्म चे वाटप करुन कुटुंबाचे समर्थन व सहभाग देखील नोंदविण्याची कार्यवाही महानगरपालिकेचे कर्मचारी, विविध संस्था, समूहसंघटिका इ.चे माध्यमातुन कार्यान्वित आहे.

**स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत विकासासाठी स्थानिक क्षेत्र निवडताना खालील टप्प्यांमध्ये कार्यवाही करण्यात आलेली आहे.**

**टप्पा १. क्षेत्र मुल्यमापन व निवड:-** या टप्प्यात खालील पध्दतीने क्षेत्राचे मुल्यमापन व निवड करण्यात आली आहे.

१.**विकासाच्या प्रकाराची निवड:-** रेट्रोफिटींग (शहर सुधारणा), पुनर्विकास(शहर नूतनीकरण) व ग्रीनफी ल्ड (शहर विस्तार) इ. साठी अनुक्रमे ५००एकर, ५० एकर व २५० एकर क्षेत्राची उपलब्धता असणे आवश्यक आहे. व या क्षेत्राचा विकास करुन त्याप्रमाणे इतर क्षेत्रांचा भविष्यात विकास करणे.

२.**क्षेत्र निवडीसाठी निकष निश्चित करणे:-** शहर अभियंता, वास्तु विशारद (आर्किटेक), क्षेत्रिय तज्ञ इ. च्या चर्चेतुन क्षेत्र निश्चितीसाठी १० निकष निश्चित करण्यात आले. त्यामध्ये लोकसंख्येची,घनता, जमिनीचा मिश्र वापर, झोपडपट्टी क्षेत्र, सध्यस्थितीतील नागरिकांची जीवनमानाची पातळी, भविष्याकालीन विकसाची संधी, इ.

३.**क्षेत्राचे शॉर्ट लिस्टींग :-** पुणे शहरांतील प्रभागांच्या माहितीच्या आधारे ५०० एकरापेक्षा जास्त सलग क्षेत्र उपलब्ध असणारे ११ क्षेत्र निवडण्यात आली.सदरची क्षेत्र (औंध,बाणेर आणि बालेवाडी,कोर सिटी एरिया,कॉलेज एरिया(एफसी रोड ते कर्वे रोड), खराडी, सिंहगड रोड (दांडेकर पूल),कर्वेनगर, हडपसर-मार्केट एरिया, नदीपात्र क्षेत्र(लकडी पूल ते नवा पूल), धनकवडी-आंबेगाव, सहकारनगर, येरवडा)

४.**क्षेत्रीय तज्ञांकडून मुल्यांकन:-** पुणे शहरातील विविध क्षेत्रीय तज्ञांकडून विविध क्षेत्रांचे मुल्यमापन करण्यात आले त्यानुसार औंध, बाणेर, बालेवाडी या क्षेत्रासाठी सर्वात जास्त मुल्यांकन मिळाले.

५.**नागरिकांचा सहभाग उपक्रम:-** दि.२०/१०/२०१५ ते दि.२६/१०/२०१५ या कालावधीत कुटुंबांचा ऑफलाईन पध्दतीने सर्व्हे करण्यात आला. त्या सर्व्हेमध्ये २३,३९३ कुटुंबांनी सहभाग नोंदविला व १,४०,००० मते प्राप्त झालीत.यामतांच्या आधारावरगुणाकंन करण्यात आल्यानंतर नागरिकांची पसंती औंध,बाणेर,बालेवाडी असल्याचे समोर आले.

६.**लोक प्रतिनिधींमार्फत मूल्यमापन:-** नागरिकांच्या सहभाग उपक्रमानंतर मा.पालकमंत्री,पुणे जिल्हा. मा.महापौर,मा.आमदार,मा.खासदार,मा.उपमहापौर,मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.गटनेते, मा.सभागृह नेते व मा.विरोधी पक्ष नेते यासह पुणे शहरातील विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख चाळीस पदाधिकारी यांची बैठक महानगरपालिका,पुणे येथे आयोजित करण्यात आली होती व त्या बैठकीत सर्वानुमते औंध, बाणेर, बालेवाडीची निवड केली आहे.

**टप्पा-२. क्षेत्र निहाय स्पर्धा:-** पुणे शहरातील विविध आर्किटेक्चर कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन औंध, बाणेर, बालेवाडी या क्षेत्रातील विकासाच्या बाबतीत स्पर्धा घेण्यात येऊन या क्षेत्राचे डेव्हलपमेंट प्रोफाईल तयार करण्यात आले.

**टप्पा-३. औंध, बाणेर, बालेवाडी क्षेत्रातील नागरिकांचा सहभाग कार्यक्रम :-** नोव्हेंबर २०१५ चे पहिल्या सप्ताह मध्ये या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या नागरिकांचा ऑफलाईन पध्दतीने प्रश्नावलीच्या स्वरुपात सर्व्हे करण्यात आला त्यामध्ये १०,१९४ कुटुंबांनी सहभाग नोंदविला. सदर सर्व्हेक्षणामध्ये या क्षेत्रामध्ये नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या, या भागाबद्दलचा नागरिकांचा दृष्टीकोन व या भागात आवश्यक असणाऱ्या स्मार्ट उपायांची माहिती प्राप्त करुन घेण्यात आली.

उपरोक्त टप्प्यानुसार औंध, बाणेर व बालेवाडी क्षेत्राची क्षेत्र निहाय विकासासाठी निवड करणेत आली.

स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत प्रामुख्याने वाहतुक आणि गतीशिलता, पाणीपुरवठा व मलनि:सारण, उर्जा तसेच स्थानिक क्षेत्र विकास उपाययोजना इ. साठी येणाऱ्या पुढील पाच आर्थिक वर्षाकरिता येणारा अंदाजीत भांडवली खर्च पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | | विवरण | खर्च (रु.कोटीत) |
|---|---|---|---|
| १ | | **पॅन सिटी उपाययोजना(वाहतुक आणि गतीशिलता+ पाणीपुरवठा व मलनि:सारण)** | **९६० ते १०३५** |
| २ | | **वाहतुक आणि गतीशिलता** | |
| | अ | स्मार्ट सार्वजनिक वाहतुक व्यवस्था (आयटीएमएस व्यवस्था, बस थांबेची सुधारणा, वायफाय सुविधा, वाहनांची देखभाल इ.) | १४० ते १६० |
| | ब | वाहतुक नियंत्रण (केंद्रीय नियंत्रण कक्ष, ट्रफिक लाईटची व्यवस्था) | ९० ते ९५ |
| | क | स्मार्ट पार्किंग (मल्टीलेवल पार्किंग) | ३५ ते ४० |
| | ड | देखभाल व दुरुस्ती | २७५ ते २९० |
| | | **एकूण** | **५४० ते ५८५** |
| ३ | | **पाणीपुरवठा व मलनि:सारण** | |
| | अ | शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणाकरणे | ३५५ ते ३७५ |
| | ब | एसटीपी केंद्रातुन उर्जा निर्मिती | ५ ते १० |
| | क | देखभाल व दुरुस्ती | ६० ते ६५ |
| | | **एकूण** | **४२० ते ४५०** |
| ४ | | **स्थानिक क्षेत्र विकास उपाययोजना** | |
| | अ | नदीसुधारणा | १२० ते १४० |
| | ब | स्मार्ट ग्रिड व सोलर एनर्जी | २६० ते २८० |
| | क | स्मार्ट मिटरिंग | २० ते २५ |
| | ड | पाण्याचा पुर्नवापर व रेन वॉटर हारवेस्टींग | ८० ते ९० |
| | इ | घनकचरा व्यवस्थापन | १० ते १५ |
| | ई | ई-गर्व्हनस(आयटी कनेक्टीव्हीटी) | २० ते २५ |
| | उ | रस्त्यांचे सुसुत्रीकरण (पदपथांची संख्या वाढवणे,सायकल ट्रॅक तयार करणे,इ.) | १९० ते २१० |
| | ऊ | झोपडपट्टी क्षेत्रातील सामाजिक व आर्थिक ट्रान्सफॉर्मेशन | ५ ते १० |
| | ए | वाहनतळ, बीआरटी,ई-रिक्षा, इलेक्ट्रीक बस इ. | ५१० ते ५५० |
| | ऐ | देखभाल व दुरुस्ती | १०५० ते ११०० |
| | | **एकूण** | **२२६५ ते २४४५** |
| | | **एकूण एकंदर** | **३२२५ ते ३४८०** |

अशा प्रकारे स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत वरील कामांसाठी अंदाजीत र.रु.३२२५ ते ३४८०कोटीचा खर्च पुढील पाच आर्थिक वर्षात अपेक्षित आहे.

केंद्रशासन स्तरावरील टप्पा-२च्या स्पर्धेमध्ये पहिल्या वर्षासाठी पात्र ठरलेल्या शहरांनी मा.स्थायी समिती,मा.सर्वसाधारण सभा व मा.राज्यशासनाच्या मान्यतेने विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) ही कंपनी कायदा २०१३ अंतर्गत एक लिमीटेड कंपनी म्हणून स्थापना केली जाणार आहे. सदर कंपनीमध्ये राज्यसरकार आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्था(अर्बन लोकल बॉडी/पुणे महानगरपालिका) ५०:५०% इक्विटी शेअर धारण करतील .केंद्र व राज्यसरकार मार्फत एसपीव्हीला बांधीव अनुदान/निधी उपलब्ध करुन देणार असून सदरचा निधी हा केवळ स्मार्टसिटी मिशन मधील उद्दीष्ट व त्यासाठी केंद्रशासनाने निश्चित करुन दिलेल्या अटीनुसारच वापरला जाणार आहे. तसेच एसपीव्ही ही कर्जे वितरण करणाऱ्या संस्थांकडून कर्ज, वापर कर्त्याचे शुल्क, कर/अधिभार सारख्या इतर स्त्रोतांमधून सुध्दा निधी उपलब्ध करुन घेऊ शकतात.

सदर एसपीव्हीच्या संचालक मंडळा मध्ये केंद्र शासनाचे, राज्यशासनाचे, महानगरपालिकेचे प्रतिनिधी तसेच स्वतंत्र संचालक (डायरेक्टर्स) व एक अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी संचालक, अतिरिक्त संचालक (सरकारी संस्थेचे प्रतिनिधी)इ. समावेश असणार आहे. एसपीव्हीचे अध्यक्ष हे विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/महापालिका आयुक्त यापैकी एक राज्यशासनस्तरावरुन निश्चित करण्यात येणार आहे. एसपीव्हीच्या संचालक मंडळावरील एक संचालक केंद्रसरकारचा एक प्रतिनिधी असेल व सदर संचालकाची भारतसरकारच्या नगरविकास विभागामार्फत करण्यात येणार आहे. तसेच एसपीव्हीच्या सीईओची नेमणूकही भारतसरकारच्या नगरविकास विभागाच्या मंजूरीने तीन वर्षाच्या अवधीसाठी करण्यात येणार आहे. एसपीव्हीच्या सीईओकडे एसपीव्हीच्या दैनंदिन कामकाजाचे नियंत्रण असेल.

एसपीव्हीच्या निर्मितीमागे प्रकल्प कार्यान्वयनाचे स्वातंत्र्य, निर्णय प्रक्रियेतील व मिशन अंमलबजावणीतील स्वाययत्ता ही प्रमुख कारणे आहेत. तथापि स्मार्टसिटी मिशनसाठी राज्यसरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना पालिका नियमांतर्गत व त्यांच्या विशिष्ट मर्यादेपर्यंत सक्षम एसपीव्ही तयार करणे अभिप्रेत आहे. यासाठी महानगरपालिकेला आपल्या काही अधिकारांचे हस्तांतरण एसपीव्हीला करणे आवश्यक आहे. प्रकल्पांच्या तांत्रिक मूल्यांकनासह त्यांना स्वीकृती आणि मंजूरी देणे, स्मार्ट सिटी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे, क्षमता बांधणी कृतीचा आढावा घेणे,स्मार्ट सिटी अंतर्गत घेण्यात आलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, स्मार्ट सिटीज मिशनच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असेल त्यानुसार करार,पार्टनरशीप्स आणि सेवा प्रदान करण्याची कार्यवाही करणे, प्रकल्पांचे गुणवत्ता नियंत्रण व आढावा घेणे इ. स्वरुपाची कामे व जबाबदाऱ्या एसपीव्हीच्या असणार आहेत.

उपरोक्त विविध टप्प्यातून तसेच प्रत्येक टप्प्यातील नागरिकांच्या सहभागातून स्मार्टसिटी अभियानांतर्गत दूसऱ्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सर्वसमावेशक पुणे शहराचा स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सदरचा स्मार्ट सिटी प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास सादर करावयाचा आहे.

तरी खालील बाबीस मा.स्थायी समितीच्या मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळावी, ही विनंती.

१.स्मार्ट सिटी अभियानांतर्गत पुणे शहराचा ''स्मार्ट सिटी प्रस्ताव/अहवाल''
मा.राज्यशासनामार्फत मा.केंद्रशासनाकडे पाठविण्यास

मा.स.कळावे.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका